# कार्यालय, नगर परिषद, कारंजा (लाड), जि. वाशिम

E mail- co.karanja@gmail.com
E mail mckaranja@gmail.com
Tel No. (०७२५६) २२२०२६


जा.क्र./न.प.का./विधी २८८२/७

दिनांक २६/१२/२०२४

## नगरपरिषदरिसोडहद्दीत जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ. प्रदर्शित करण्याबाबत नागरिकांच्या माहितीसाठी SOP (Standard Operating Procedure) कार्यमानक प्रणाली

१) सर्व नागरिकांनी नगरपरिषद कारंजा(लाड) हद्दीत जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ. प्रदर्शित करण्याकरिताonlineपद्धतीनेअर्ज https://mahaulb.in/MahaULB/common/application/showServicePage/NOH/noc/noc या लिंक वर सादर करावा किंवा ऑफलाईन अर्ज नगरपरिषद कारंजा (लाड) कार्यालय आवक-जावक विभागाकडे द्यावा.

२) सदर अर्ज जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ. प्रदर्शित करण्यापूर्वी किमान ७ दिवस आधी अर्ज करावा.

३)अर्जदाराने जाहिरात परवानगीसाठी अर्ज करताना नगरपरिषद द्वारेनिश्चित केलेल्या जागेवर जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ. परवानगीसाठी अर्ज करावा.

४) सदर जाहिरात अर्जावर कार्यवाही करताना जाहिरात परवानगी विभाग (मिळकत/बाजार विभाग) यांनी IWBP पोर्टल द्वारे नगरपरिषदद्वारे ठरवून देण्यात आलेली फी आकारल्यानंतर QR कोडसहित NOC देण्यात येईल. सदर NOC च्या प्रती नगरपरिषद कारंजा(लाड) चे स्वच्छता निरीक्षक श्री.राम बनसोड (अनधिकृत जाहिरात फलकाबाबत नोडल अधिकारी) व कारंजा(लाड) पोलिस स्टेशन यांना देण्यात येईल.

५)अर्जदार यांनी यानंतर न.प. कारंजा (लाड) कार्यालयात जाहिरात फी भरल्यानंतर QR कोडसहित जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ छापावेत व नेमून दिलेल्या जागेतच परवानगी देण्यात आलेल्या कालावधीसाठी लावावेत.

६) अनधिकृत जाहिरात फलकाबाबत नोडल अधिकारी श्री.राम बनसोड स्वच्छता निरीक्षक,(भ्रमणध्वनी क्रमांक ९२२५५६००४२ )हे तक्रार निवारण अधिकारी म्हणून कार्य करतील.

७)अनधिकृत जाहिरात फलकाबाबत नोडल अधिकारी(तक्रार निवारण अधिकारी) हे आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कारंजा(लाड) हद्दीतील अनधिकृत जाहिरात फलक/होर्डिंग/ बॅनर/फ्लेक्स काढण्याची कार्यवाही करतील. सदर कार्यवाहीसाठी आवश्यकता असल्यास पोलिस बंदोबस्त घेतील. तसेच संबधीतांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपानास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यासाठी पोलिस स्टेशनला पत्र देऊन गुन्हा दाखल करणेची कार्यवाही

२@०
-०१

करतील. तसेच सदर अनधिकृत जाहिरात फलक / होर्डिंग / बॅनर/फ्लेक्स निष्कासित करण्यासाठी येणारा खर्च व दंडाची रक्कम वसूल करतील .

८)अनधिकृत जाहिरात फलकाबाबत नोडल अधिकारी(तक्रार निवारण अधिकारी) यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने शहरातील रस्त्याच्या कडेला, बाजूला, चौकात लावण्यात येणाऱ्या नियमबाह्य आकाराच्या, उंचीच्या होर्डिंग वर तात्काळ निष्कासनाची कार्यवाही करावी. सर्व अनधिकृत जाहिरात फलक/होर्डिंग/बॅनर/फ्लेक्स वर कार्यवाही करताना digital स्वरुपात सदर अनधिकृत जाहिरात फलक/होर्डिंग / बॅनर/फ्लेक्स यांचे फोटो, व्हिडीओ रेकॉर्डिंग पुरावे म्हणून जतन करून ठेवतील.

९) नागरिकांना अनधिकृत जाहिरात फलक/होर्डिंग/बॅनर/फ्लेक्स संदर्भात तक्रार या कार्यालयाचा क्रमांक ०७२५६ २२२०२६ यावर अथवा https://mahaulb.in/MahaULB/index या संकेतस्थळावर दाखल करता येईल.

१०) मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशानुसार अनधिकृत जाहिरात फलक/होर्डिंग/ बॅनर/फ्लेक्स बाबत नागरिकांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

११) सदर कार्यमानक प्रणालीची कारंजा(लाड) शहरातील शासकीय कार्यालय, वर्तमानपत्र, कार्यालयीन संकेतस्थळ इत्यादिवर प्रसिद्धी करण्यात आली आहे.

(दिपक मोरे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद कारंजा(लाड)